असा. क्र. २२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**
**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, मे ५, २००६/वैशाख १५, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.**–महाराष्ट्र राज्य व्यवसाय व्यापार आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. . .

दिनांक ४ मे २००६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ५ मे २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९७५ चा महा. १६. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) अधिनियम, २००६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



[ **किंमत** : रुपये ९.०० ]

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ यामध्ये मूळ अनुसूची एक ऐवजी नवीन अनुसूची दाखल करणे.

**२.** महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याला जोडलेल्या अनुसूची एक ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल आणि ती दिनांक १ एप्रिल २००६ पासून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :— १९७५ चा महा. १६.

**" अनुसूची एक**

(कलम ३ पहा)

**व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कराच्या दरांची अनुसूची**

| अनुक्रमांक | व्यक्तींचा वर्ग | कराचा दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | रुपये |
| १. | वेतनदार व मजुरी मिळविणारे— | |
| | ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी :— | |
| | (अ) २,५०० रुपयांहून अधिक नाही. | काही नाही. |
| | (ब) २,५०० रुपयांहून अधिक परंतु ३,५०० रुपयांहून अधिक नाही ; | दरमहा रुपये ६०. |
| | (क) ३,५०० रुपयांहून अधिक परंतु ५,००० रुपयांहून अधिक नाही ; | दरमहा रुपये १२०. |
| | (ड) ५,००० रुपयांहून अधिक परंतु १०,००० रुपयांहून अधिक नाही ; | दरमहा रुपये १७५. |
| | (इ) १०,००० रुपयांहून अधिक | दरसाल रुपये २,५०० हा कर पुढील पद्धतीने देण्यात येईल :— (अ) फेब्रुवारी महिना वगळता दरमहा रुपये २०० ; (ब) फेब्रुवारी महिन्यात रुपये ३००. |
| २. | (अ) विधि व्यवसायी आणि सॉलिसिटर व लेख प्रमाणक ; | |
| | (ब) वैद्यक व्यवसायी आणि वैद्यक सल्लागार व दंतवैद्य ; | |
| | (क) तांत्रिक व व्यावसायिक सल्लागार आणि वास्तु-शास्त्रज्ञ, अभियंते, आर.सी.सी. सल्लागार, कर सल्लागार, सनदी लेखापाल, विमागणक व व्यवस्थापन सल्लागार ; | |

अनुसूची एक—चालू

| | अ.क्र. | व्यक्तींचा वर्ग | कराचा दर |
|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) |
| १९३८ चा ४. | | (ड) विमा अधिनियम, १९३८ अन्वये नोंदणी केलेले किंवा लायसन मिळालेले प्रमुख एजंट, प्रधान एजंट, विमा एजंट व सर्वेक्षक आणि हानि निर्धारक, यू. टी. आय. योजनेखालील यू.टी.आय. एजंट, टपाल योजनेखालील राष्ट्रीय अल्पबचत एजंट ; | |
| | | (ई) अडत्ये, दलाल व ब्रोकर (या अनुसूचीत अन्यत्र इतर कोणत्याही नोंदीमध्ये समाविष्ट केलेले इस्टेट ब्रोकर वगळून) ; | |
| | | (फ) सर्व प्रकारचे कंत्राटदार (या अनुसूचीत अन्यत्र इतर कोणत्याही नोंदीमध्ये समाविष्ट केलेले बांधकाम कंत्राटदार वगळून) ; आणि | |
| | | (ग) हिरा संस्कारक व हिरा झिलईगार, या व्यवसायांमध्ये एका वर्षाहून कमी नसेल एवढा काळ असलेल्या व्यक्ती. | दरसाल रुपये २,५००. |
| १९५२ चा ७४. | ३. | (अ) भावी संविदा (विनियमन) अधिनियम, १९५२ अन्वये मान्यता मिळालेल्या संघटनेचे सदस्य ; | दरसाल रुपये २,५००. |
| १९५६ चा ४२. | | (ब) (एक) प्रतिभूति संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ अन्वये मान्यता मिळालेल्या रोखे बाजारांचे सदस्य ; | दरसाल रुपये २,५००. |
| | | (दोन) रोखे बाजाराकडून मान्यता मिळालेले अवसर्जक (Remisiers). | दरसाल रुपये २,५००. |
| | ४. | (अ) बांधकाम कंत्राटदार ; | दरसाल रुपये २,५००. |
| | | (ब) एका वर्षाहून कमी नसेल एवढा काळ व्यवसायामध्ये असलेले इस्टेट एजंट, ब्रोकर किंवा नळकारागीर. | दरसाल रुपये २,५००. |
| १९५६ चा १. १९४९ चा १०. | ५. | कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी केलेल्या कंपन्यांचे आणि बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे बँक व्यवसाय कंपन्यांचे संचालक (शासनाने नामनिर्देशित केलेले असतील त्या व्यतिरिक्त). | दरसाल रुपये २,५००. |

अनुसूची एक—चालू

| अ.क्र. (१) | व्यक्तींचा वर्ग (२) | कराचा दर (३) | |
|---|---|---|---|
| | **स्पष्टीकरण.**—या नोंदीच्या प्रयोजनार्थ " संचालक " या संज्ञेमध्ये, ज्या व्यक्ती, ज्या कंपन्यांची नोंदणीकृत कार्यालये महाराष्ट्र राज्याच्या बाहेर आहेत त्या कंपन्यांच्या संचालक आहेत व ज्या महाराष्ट्र राज्यात रहात नाहीत अशा व्यक्तींचा समावेश असणार नाही. | | |
| ६. | (अ) रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेडद्वारे लायसन देण्यात आलेले बुकमेकर्स आणि प्रशिक्षक ; | दरसाल रुपये २,५००. | |
| | (ब) उक्त क्लबने लायसन दिलेले जॉकी. | दरसाल रुपये २,५००. | |
| ७. | चलचित्र उद्योग, रंगभूमी, वाद्यवृंद, दूरदर्शन, मॉडेलिंग किंवा जाहिरात उद्योग यांमधील स्वतःचा व्यवसाय (स्वतःचा रोजगार) असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत पुढीलप्रमाणे :— | | |
| | (अ) लेखक, भावगीतकार, दिग्दर्शक, अभिनेते आणि अभिनेत्री [कनिष्ठ कलाकार (ज्युनियर आर्टिस्ट) वगळून] , संगीतकार, पार्श्वगायक/गायिका, छायाचित्रणकार (छायाचित्रक चालक), ध्वनिमुद्रक, संकलक आणि स्थिर छायाचित्रणकार ; | दरसाल रुपये २,५००. | |
| | (ब) कनिष्ठ कलाकार (ज्युनिअर आर्टिस्ट), निर्मिती व्यवस्थापक, सहायक दिग्दर्शक, सहायक ध्वनी-मुद्रक, सहायक संकलक आणि नृत्य कलाकार (नर्तक). | दरसाल रुपये १,०००. | |
| ८. | महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ खाली नोंदणी केलेले व्यापारी किंवा केवळ केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ खाली नोंदणी केलेले व्यापारी, ज्यांच्या विक्रीची किंवा खरेदीची वार्षिक उलाढाल,— | | २००५ चा महा. ९<br>१९५६ चा ७४. |
| | (एक) रुपये २५ लाख किंवा त्याहून कमी आहे ; | दरसाल रुपये २,०००. | |
| | (दोन) रुपये २५ लाखांहून अधिक आहे. | दरसाल रुपये २,५००. | |
| ९. | कारखाना अधिनियम, १९४८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले, जे वरील नोंद क्रमांक ८ मध्ये समावेश न केलेले कारखान्यांचे कार्यचालक. | दरसाल रुपये २,५००. | १९४८ चा ६३. |

अनुसूची एक—चालू

| अ.क्र. (१) | व्यक्तींचा वर्ग (२) | कराचा दर (३) |
|---|---|---|
| १०. १(अ) | १९४८ चा मुंबई ७९. मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ लागू असलेल्या क्षेत्रात ज्यांच्या आस्थापना असतील व ज्यांचा नोंद क्र. ८ मध्ये समावेश करण्यात आलेला नसेल असे उपरोक्त अधिनियमामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, असलेले आस्थापनांचे नियोक्ते. | |
| | अशा आस्थापनांचे नियोक्ते जेथे— | |
| | (अ) कोणताही कर्मचारी नियुक्त केलेला नाही ; | दरसाल रुपये १,०००. |
| | (ब) दोनपेक्षा अधिक कर्मचारी नियुक्त केलेले नाहीत ; | दरसाल रुपये २,०००. |
| | (क) दोनपेक्षा अधिक कर्मचारी नियुक्त केलेले आहेत. | दरसाल रुपये २,५००. |
| (ब) | १९४८ चा मुंबई ७९. ज्यांच्या आस्थापना मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ लागू असलेल्या क्षेत्रात नसतील व ज्यांचा नोंद क्र. ८ मध्ये समावेश करण्यात आलेला नसेल असे, उपरोक्त अधिनियमामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले आस्थापनांचे नियोक्ते. | |
| | अशा आस्थापनांचे नियोक्ते, जेथे— | |
| | (अ) कोणताही कर्मचारी नियुक्त केलेला नाही ; | दरसाल रुपये ५००. |
| | (ब) दोनपेक्षा अधिक कर्मचारी नियुक्त केलेले नाहीत ; | दरसाल रुपये १,०००. |
| | (क) दोनपेक्षा अधिक कर्मचारी नियुक्त केलेले आहेत. | दरसाल रुपये २,५००. |
| (२) | शासनाच्या किंवा अपंग व्यक्तीच्या मालकीच्या किंवा त्यांच्याकडून चालविण्यात येणाऱ्या एसटीडी/आयएसडी बूथ किंवा सायबर कॅफे व्यतिरिक्त एसटीडी/आयएसडी बूथचे मालक/बूथ चालविणाऱ्या व्यक्ती ; | दरसाल रुपये १,०००. |
| (३) | व्हिडीओ किंवा ऑडिओ पार्लर्स, व्हिडीओ किंवा ऑडिओ कॅसेट लायब्ऱ्या, व्हिडीओ गेम पार्लर्स चालविणारे ; | दरसाल रुपये २,५००. |

अनुसूची एक—चालू

| अ.क्र. (१) | व्यक्तींचा वर्ग (२) | कराचा दर (३) | |
|---|---|---|---|
| | (४) केबल चालक, चित्रपट वितरक ; | दरसाल रुपये २,५००. | |
| | (५) मंगल कार्यालयांचे, परिषद सभागृहांचे, सौंदर्य प्रसाधनगृहांचे, आरोग्य केंद्रांचे, पूल पार्लर्सचे मालक/ते चालविणाऱ्या व्यक्ती ; | दरसाल रुपये २,५००. | |
| | (६) सर्व प्रकारचे शिकवणी वर्ग चालविणाऱ्या/ घेणाऱ्या व्यक्ती. | दरसाल रुपये २,५००. | |
| ११. | स्वयंचलित वाहनांचे पेट्रोल/डिझेल/तेल पंप आणि संधारण केंद्रे/मोटार घरे व कार्यशाळा यांचे मालक (किंवा पट्टेदार) ; | दरसाल रुपये २,५००. | |
| १२. | लायसनप्राप्त परदेशी दारूचे विक्रेते व मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले निवासी हॉटेले व चित्रपटगृहे येथील नियोक्ते. | दरसाल रुपये २,५००. | १९४८ चा मुंबई ७९. |
| १३. | भाड्याने किंवा मोबदला घेऊन वापरण्यात येणाऱ्या किंवा तशा वापरासाठी योग्य तो बदल करून घेण्यात आलेल्या वाहतुकीच्या वाहनांच्या, मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये देण्यात आलेल्या परवान्यांचे धारक, जेव्हा अशी कोणतीही व्यक्ती पुढील वाहनांचा परवाना किंवा परवाने धारण करीत असेल अशा बाबतीत,— | | १९८८चा ५९. |
| | (अ) तिचाकी मालवाहू वाहन, अशा प्रत्येक तिचाकी मालवाहू वाहनासाठी ; | दरसाल रुपये ७५०. | |
| | (ब) कोणतीही टॅक्सी, प्रवासी गाडी, अशा प्रत्येक वाहनासाठी ; | दरसाल रुपये १,०००. | |
| | (क) (एक) नोंद (अ) मध्ये समाविष्ट केलेल्या वाहनांव्यतिरिक्त मालवाहू वाहने ; | दरसाल रुपये १,५००. | |
| | (दोन) मालमोटारी किंवा बसगाड्या अशा प्रत्येक वाहनासाठी ; | दरसाल रुपये १,५००. | |
| | परंतु, या नोंदीखालील धारकांकडून देय होणारा एकूण कर दरसाल २,५०० रुपयांहून अधिक नसेल. | | |
| १४. | मुंबई सावकार अधिनियम, १९४६ अन्वये लायसन देण्यात आलेले सावकार. | दरसाल रुपये २,५००. | १९४७ चा मुंबई ३१. |
| १५. | चिटफंड चालविणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था | दरसाल रुपये २,५००. | |

अनुसूची एक—चालू

| अ.क्र. (१) | | व्यक्तींचा वर्ग (२) | कराचा दर (३) |
|---|---|---|---|
| १९६१ चा महा. २४. | १६. | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी केल्याचे मानण्यात आलेल्या किंवा कोणत्याही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका करणाऱ्या सहकारी संस्था— | |
| | | (एक) राज्य पातळीवरील संस्था | दरसाल रुपये २,५००. |
| | | (दोन) सहकारी साखर कारखाने व सूत गिरण्या | दरसाल रुपये २,५००. |
| | | (तीन) जिल्हा पातळीवरील संस्था | दरसाल रुपये ७५०. |
| | | (चार) हातमाग विणकर सहकारी संस्था | दरसाल रुपये ५००. |
| | | (पाच) वरील खंड (एक), (दोन), (तीन) व (चार) द्वारे समाविष्ट न केलेल्या इतर सर्व सहकारी संस्था | दरसाल रुपये ७५०. |
| १९४९ चा १०. | १७. | बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे बँक व्यवसाय कंपन्या ; | दरसाल रुपये २,५००. |
| १९५६ चा १. | १८. | कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या व कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका करणाऱ्या कंपन्या ; | दरसाल रुपये २,५००. |
| १९३२ चा ९. | १९. | कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका करणाऱ्या भागीदारी संस्थेचा (मग तिची भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ अन्वये नोंदणी करण्यात आलेली असो किंवा नसो) प्रत्येक भागीदार ; | दरसाल रुपये २,५००. |
| | २०. | कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका करणाऱ्या हिंदू अविभक्त कुटुंबाचा (अज्ञान नसणारा) प्रत्येक सह दायाद ; | दरसाल रुपये २,५००. |

**अनुसूची एक—समाप्त**

| अ.क्र. (१) | व्यक्तींचा वर्ग (२) | कराचा दर (३) |
|---|---|---|
| २१. | पूर्ववर्ती कोणत्याही नोंदीमध्ये उल्लेख केलेल्या व्यक्तीं-व्यतिरिक्त असलेल्या, कोणताही व्यवसाय, व्यापार, आजीविका किंवा नोकरी करणाऱ्या आणि ज्यांच्या बाबतीत, कलम ३, पोट-कलम (२) च्या दुसऱ्या परंतुकान्वये अधिसूचना काढण्यात आलेली आहे, अशा व्यक्ती. | दरसाल रुपये २,५००. |

**टीप १.**—या अनुसूचीत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या अनुसूचीच्या एकापेक्षा अधिक नोंदींमध्ये एखाद्या व्यक्तीचा समावेश करण्यात आला असेल त्या बाबतीत, त्या नोंदींपैकी कोणत्याही नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेला कराचा कमाल दर त्याच्या बाबतीत लागू होईल. ही तरतूद अनुसूचीच्या नोंद १६ (चार) ला लागू असणार नाही.

**टीप २.**—अनुसूचीच्या नोंद ८ च्या प्रयोजनांकरिता मागील वर्षाच्या " विक्री किंवा खरेदीच्या उलाढालीवर " व्यवसाय कर ठरविण्यात येईल. जर अशा व्यापाऱ्याच्या बाबतीत, मागील वर्ष नसेल तर, व्यवसाय कराचा दर रु. २,००० इतका असेल. " खरेदीची उलाढाल " किंवा " विक्रीची उलाढाल " या शब्दप्रयोगाला, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ " अन्वये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल. ". २००५ चा महा. ९.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ४६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, मे ५, २००६/वैशाख १५, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments (Amendment) Act, 2006 (Mah. Act No. XVII of 2006), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XVII OF 2006.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 5th May 2006.).*

An Act further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975.

Mah. XVI of 1975. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Fifty-seventh Year of the Republic of India as follows :—

**1.** This Act may be called the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments (Amendment) Act, 2006. Short title.



 [ किंमत : रुपये ९.०० ]

Substitution of Schedule I of Mah. XVI of 1975.

**2.** For Schedule I appended to the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, the following Schedule shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st April 2006, namely :— Mah. XVI of 1975.

"SCHEDULE I

(*See* section 3)

*Schedule of rates of tax on professions, trades, callings and employments.*

| Serial No. (1) | Class of Persons (2) | Rate of tax (3) |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1. | Salary and wage earners—Such persons whose monthly salaries or wages,— | |
| | (*a*) do not exceed rupees 2,500 | Nil. |
| | (*b*) exceeds rupees 2,500 but do not exceed rupees 3,500 ; | 60 per month. |
| | (*c*) exceeds rupees 3,500 but do not exceed rupees 5,000 ; | 120 per month. |
| | (*d*) exceeds rupees 5,000 but do not exceed rupees 10,000 ; | 175 per month |
| | (*e*) exceeds rupees 10,000 . . | 2,500 per annum, to be paid in the following manner :— (a) rupees two hundred per month except for the month of February ; (b) rupees three hundred for the month of February. |
| 2. | (*a*) Legal Practitioners including Solicitor and Notaries ; | |
| | (*b*) Medical Practitioners including Medical Consultants and Dentists ; | |
| | (*c*) Technical and Professional Consultants, including Architects, Engineers, R.C.C. Consultants, Tax Consultants, Chartered Accountants, Actuaries and Management Consultants ; | |
| | (*d*) Chief Agents, Principal Agents, Insurance Agents and Surveyors and Loss Assessors registered or licensed under the Insurance Act, 1938, U.T.I. Agents under U.T.I. Scheme, N.S.S. agents under postal scheme ; (4 of 1938.) | |
| | (*e*) Commission Agents, *Dalals* and Brokers (other than estate brokers covered by any other entry elsewhere in this Schedule) ; | |
| | (*f*) All types of Contracts (other than building contractors covered by any other entry elsewhere in this Schedule) ; and | |
| | (*g*) Diamond dressers and diamond polishers, having not less than one year's standing in the profession. | 2,500 per annum. |

| | (1) | (2) | (3) |
|---|---|---|---|
| 74 of 1952. | 3. | (*a*) Members of Association recognised under the Forward Contracts (Regulation) Act, 1952 ; | 2,500 per annum. |
| 42 of 1956. | | (*b*) (*i*) Member of Stock Exchanges recognised under the Security Contracts (Regulation) Act, 1956 ; | 2,500 per annum. |
| | | (*ii*) Remisiers recognised by the Stock Exchange ; | 2,500 per annum. |
| | 4. | (*a*) Building Contractors ; . . | 2,500 per annum. |
| | | (*b*) Estate Agents, Brokers or Plumbers, having not less than one year's standing in the profession. | 2,500 per annum. |
| 1 of 1956. 10 of 1949. | 5. | Directors (other than those nominated by Government) of Companies registered under the Companies Act, 1956, and Banking Companies as defined in the Banking Regulation Act, 1949. | 2,500 per annum. |
| | | *Explanation.*—The term 'Directors' for the purpose of this entry will not include the persons who are Directors of the companies whose registered offices are situated outside the State of Maharashtra and who are not residing in the State of Maharashtra. | |
| | 6. | (a) Bookmakers and Trainers licensed by the Royal Western India Turf Club Limited ; | 2,500 per annum. |
| | | (b) Jockeys licensed by the said Club. . . | 2,500 per annum. |
| | 7. | Self-employed persons in the Motion Picture Industry, Theatre, Orchestra, Television, Modelling or Advertising Industries, as follows :— | |
| | | (*a*) Writers, Lyricists, Directors, Actors and Actresses (excluding Junior Artists), Musicians, Playback Singers, Cameramen, Recordist, Editors and Still-Photographers ; | 2,500 per annum. |
| | | (*b*) Junior Artists, Production Managers, Assistant Directors, Assistant Recordists, Assistant Editors and Dancers. | 1,000 per annum. |
| Mah. IX of 2005. 74 of 1956. | 8. | Dealers registered under the Maharashtra Value Added Tax Act, 2002, or Dealers registered only under the Central Sales Tax Act, 1956, whose annual turnover of sales or purchases,— | |
| | | (*i*) is rupees 25 lakh or less . . | 2,000 per annum. |
| | | (*ii*) exceeds rupees 25 lakh . . | 2,500 per annum. |

| (1) | (2) | (3) | |
|---|---|---|---|
| 9. | Occupiers of Factories as defined in the Factories Act, 1948, who are not covered by entry 8 above. | 2,500 per annum. | 63 of 1948. |
| 10. | (1) (A) Employers of establishments as defined in the Bombay Shops and Establishments Act, 1948, where their establishments are situated within an area to which the aforesaid Act applies, and who are not covered by entry 8— Such employers of establishments,— | | Bom. LXXIX of 1948. |
| | (a) where no employee is employed | 1,000 per annum. | |
| | (b) where not exceeding two employees are employed ; | 2,000 per annum. | |
| | (c) where more than two employees are employed. | 2,500 per annum. | |
| | (B) Employers of establishments as defined in the Bombay Shops and Establishments Act, 1948, where their establishments are not situated within an area to which the aforesaid Act applies, and who are not covered by entry 8. Such employers of establishment,— | | Bom. LXXIX of 1948. |
| | (a) where no employee is employed ; | 500 per annum. | |
| | (b) where not exceeding two employees are employed ; | 1,000 per annum. | |
| | (c) where more than two employees are employed. | 2,500 per annum. | |
| | (2) Persons owning/running STD/ISD booths or Cyber Cafes, other than those owned or run by Government or by physically handicapped persons ; | 1,000 per annum. | |
| | (3) Conductors of Video or Audio Parlours, Video or Audio Cassette Libraries, Video Game Parlours ; | 2,500 per annum. | |
| | (4) Cable Operators, Film Distributors . . | 2,500 per annum. | |
| | (5) Persons owning/running marriage halls, conference halls, beauty parlours, health centres, pool parlours ; | 2,500 per annum | |
| | (6) Persons running/conducting coaching classes of all types. | 2,500 per annum. | |

| | (1) | (2) | (3) |
|---|---|---|---|
| | 11. | Owners or Lessees of Petrol/Diesel/Oil Pumps and Service Stations/Garages and Workshops of Automobiles. | 2,500 per annum. |
| Bom. LXXIX of 1948. | 12. | Licensed Foreign Liquor Vendors and employers of Residential Hotels and Theatres as defined in the Bombay Shops and Establishments Act, 1948. | 2,500 per annum. |
| 59 of 1988. | 13. | Holders of permits for Transport Vehicles granted under the Motor Vehicles Act, 1988, which are used or adopted to be used for hire or reward, where any such person holds permit or permits for,— | |
| | | (*a*) three wheeler goods vehicles, for each such vehicle ; | 750 per annum. |
| | | (*b*) any taxi, passenger car, for each such vehicle ; | 1,000 per annum. |
| | | (*c*) (*i*) goods vehicles other than those covered by (*a*) ; | 1,500 per annum. |
| | | (*ii*) trucks or buses for each such vehicle : | 1,500 per annum. |
| | | Provided that the total tax payable by a holder under this entry shall not exceed rupees 2,500 per annum. | |
| Bom. XXXI of 1947. | 14. | Money-lenders licensed under the Bombay Money-lenders Act, 1946. | 2,500 per annum. |
| | 15. | Individuals or Institutions conducting Chit Funds. | 2,500 per annum. |
| Mah. XXIV of 1961. | 16. | Co-operative Societies registered or deemed to be registered under the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and engaged in any profession, trade or calling,— | |
| | | (*i*) State Level Societies . . | 2,500 per annum. |
| | | (*ii*) Co-operative Sugar Factories and Spinning Mills ; | 2,500 per annum. |
| | | (*iii*) District Level Societies . . | 750 per annum. |
| | | (*iv*) Handloom Weavers Co-operative Societies ; | 500 per annum. |
| | | (*v*) All other Co-operative Societies not covered by clauses (*i*), (*ii*), (*iii*) and (*iv*) above. | 750 per annum. |

| (1) | (2) | (3) | |
|---|---|---|---|
| 17. | Banking Companies, as definded in the Banking Regulation Act, 1949. | 2,500 per annum. | 10 of 1949. |
| 18. | Companies registered under the Companies Act, 1956 and engaged in any profession, trade or calling. | 2,500 per annum. | 1 of 1956. |
| 19. | Each partner of a firm (whether registered or not under the Indian Partnership Act, 1932) engaged in any profession, trade or calling. | 2,500 per annum. | 9 of 1932. |
| 20. | Each Co-parcener (not being a minor) of a Hindu Undivided Family, which is engaged in any profession, trade or calling. | 2,500 per annum. | |
| 21. | Persons other than those mentioned in any of the preceding entries who are engaged in any profession, trade, calling or employment and in respect of whom a notification is issued under the second proviso to sub-section (2) of section 3. | 2,500 per annum. | |

*Note 1.*—Notwithstanding anything contained in this Schedule, where a person is covered by more than one entry of this Schedule, the highest rate of tax specified under any of those entries shall be applicable in his case. This provision shall not be applicable to entry 16(*iv*) of the Schedule.

*Note 2.*—For the purposes of Entry 8 of the Schedule, the Profession Tax shall be calculated on the basis of the " turnover of sales or purchases " of the previous year. If there is no previous year for such dealer, the rate of Profession Tax shall be Rs. 2,000. The expressions " turnover of sales " or " turnover of purchases " shall have the same meaning as assigned to them, respectively, under the Maharashtra Value Added Tax Act, 2002. ". Mah. IX of 2005.